# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/11/2022 (शनिवार) दुपार

---

## फसवणुक

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत पाटणसावंगी सावनेर येथे दिनांक २२/०९/२०२२ चे ००.०१ वा. ते दिनांक ०६/११/२०२२ चे २४.०० वा. दरम्यान यातील अज्ञात आरोपी टेलीग्राम आयडी .@Alex-Clound https;/t 9588. या लिंकचा धारक याने नमुद घटना वेळी ठिकाणी पार्ट टाईम जॉबचे नावावर फिर्यादी नामे— राकेश निलकंठ करकाडे, वय २९ वर्ष, रा आदर्श नगर, पाटणसावंगी, ता सावनेर यास प्रोडक्ट खरेदीचा टास्क देवुन लींकवर येत असलेल्या वेगवेगळी nUPI ID गुगल पे व पेटीएमव्दारे एकुण ३२५,८१४/— रूपयाचा रीचार्ज करायला लावुन (पैसे पाठवायला लावुन) फिर्यादीची आर्थिक फसवणुक केलेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४२० भांदवि. सहकलम ६५ (ड) माहीती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मुळूक, पोलीस स्टेशन सावनेर मो. नं. ९५५२५६४०४७ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत १३ किमी. अंतरावर मौजा खापरी बारोकर शिवार दिनांक १८/११/२०२२ चे १२.०० वा. दरम्यान नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील हिरो होंडा एच. एफ. डिलक्स क्र एम एच—४०/बि. यू.—६३५३ चा चालक आरोपी नामे— रोहीत दत्तुजी गाडरे, वय १९ वर्ष, रा. जुनापानी, ता. कारंजा. जि. वर्धा याने त्याचे ताब्यातील वाहन बेदरकारपणे व निश्काळजीपणे चालवुन त्याचे मोटरसायकलच्या मागे बसलेला इसम नामे—ललित भिमराव डोबले, वय ४५ वर्ष, रा. जुनापाणी, ता. कारंजा जि. वर्धा याचे मरणास तसेच आरोपीचे स्वत:चे जखमी होण्यास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरकारतर्फे पोलीस नाईक गजानन तितरे, ब. नं. २०९७ पोलीस स्टेशन कोंढाळी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द २७९, ३३८, ३०४ (अ) भादवि. सह कलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक मिना बारंगे पोलीस स्टेशन कोंढाळी मो नं. ९५२७४७५२१७ करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**